# महाराष्ट्र शासन

## श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.

### सामान्य परिचर्या प्रसविका अभ्यासक्रम ( ३ वर्ष) प्रवेश

## * जाहिरात *

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे सुरु होणा-या तीन वर्ष मुदतीच्या जनरल नर्सिंग व मिडवायफरी प्रशिक्षणासाठी पुणे महसूल विभागातून (पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर) महिला व पुरुष उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवाराने पुणे महसूल विभागातील स्त्री व पुरुष उमेदवाराने प्रवेशासाठी महसूल निहाय नेमून दिलेल्या कोटयाचा फायदा घेणेसाठी महसूल विभागातील जिल्हाचा रहिवासी असल्याचा (सेतू कार्यालयाचा) दाखला सादर करावा.

**शैक्षणिक पात्रताः**

या अभ्यासक्रमासाठी बारावी परिक्षेतील गुणानुसार जागा भरण्यात येतील. १२ वी शास्त्र शाखेचे उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (१० + २) अथवा समतुल्य परिक्षा शासन मान्य संस्थेमधून प्राधान्याने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या शास्त्र व इंग्रजी विषयांसह कमीत कमी ४० टकके गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

पुरुषांचे प्रमाण एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त ३० टक्के राखीव राहील. सदर जागा नियम क्रमांक १२ मध्ये उल्लेखिलेल्या राखीव जागाचे आळीपाळीने पालन केले जाईल व त्यांना राहण्याची व मेसची व्यवस्था स्वतः करावी लागेल.

शासकिय नियमानुसार मागासवर्गीय उमेदवारांना राखीव जागा ठेवण्यात येतील.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथील भरावयाच्या २० जागांचा तपशील व आरक्षण कोटा पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | भरतीचा प्रवर्ग | | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | खुला | | १० * |
| ०२ | अनुसूचित जाती | अ.जा. | ०३ ** |
| ०३ | अनुसूचित जमाती | अ.ज. | ०१ |
| ०४ | विमुक्त जाती (अ) | वि.जा.-(अ) | ०० |
| ०५ | भटक्या जमाती (ब) | भ.ज.-(ब) | ०१ |
| ०६ | भटक्या जमाती (क) | भ.ज.-(क) | ०१ ** |
| ०७ | भटक्या जमाती (ड) | भ.ज.-(ड) | ०० |
| ०८ | इतर मागासवर्गीय / विशेष मागास प्रवर्ग | इ.मा.व. | ०४ ** |
| | एकूण जागा | | २० |

** उपलब्ध असल्यास ३ पदे पुरुष उमेदवारासाठी, १ पद ए.एन.एम./एम.पी.डब्लू.साठी राखीव राहील.(ए.एन.एम./एम.पी.डब्लू उमेदवार या अभ्यासक्रमाबाबतच्या अन्य अटींची पूर्तता करीत असावेत.*

*** उपलब्ध असल्यास अ.जा., भ.ज.(क) व इ.मा.व. या प्रवर्गातील प्रत्येकी १ जागा पुरुष उमेदवारांसाठी राखीव राहील.*

**अपंगांसाठी राखीव जागा :**

अपंग व्यक्तीसाठी शासकीय नियमानुसार ३ टक्के जागा आरक्षित राहतील. (Disability of Locomotor to the tune of 40% to 50 % of the Lower extremity)

सदर उमेदवारांची अंपगत्वाची पडताळणी याकरीता सक्षम प्राधिकरण यांनी स्थापन केलेल्या वैद्यकीय मंडळामार्फत केली जाईल.

**वयोमर्यादा** : प्रवेशावेळी मागील वर्षाच्या, ३१ डिसेंबर रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये.

**अर्जाची किंमत:**

खुला गट रुपये १००/- व मागासवर्गीयासाठी रुपये ५०/-

(प्रवेश अर्ज मिळण्यासाठी १२ वी गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र साक्षांकित प्रत आवश्यक.)

**अर्ज मिळण्याचे ठिकाण :** अधिसेविका कार्यालयात दिनांक २०/०८/२०१८ ते २५/०८/२०१८ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत प्रवेश अर्जाची किंमत भरुन मिळू शकते. (रविवार सोडून, शासकीय सुटट्रीसहीत सर्व दिवशी मिळतील.)

**अर्ज स्वीकृती: तपशीलवार भरलेले अर्ज दिनांक २०/०८/२०१८ ते २७/०८/२०१८ पर्यंत सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० पर्यंत स्वीकारले जातील.** (रविवार सोडून, शासकीय सुटट्रीसहीत सर्व दिवशी)

कोणताही अर्ज खालील प्रमाणपत्रांच्या छायांकित व सांक्षांकित सत्यप्रती जोडलेल्या नसतील तर विचारात घेतला जाणार नाही.

१. शाळा सोडल्याचा दाखला.
२. १० वी व १२ वी (१०+२) परिक्षांच्या गुणपत्रिका व १० वी उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र.
३. अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो.
४. अर्हताकारी परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण करण्यात आली या बाबत शाळा किंवा महाविद्यालयाचे प्रमाणपत्र.
५. अधिवास (डोमिसाईल) व नागरिकत्व (नॅशनॅलिटी) दाखल्याच्या साक्षांकित प्रती.
६. जात प्रमाणपत्र
७. जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नसल्यास सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा उमेदवारांना प्रशिक्षणातून कमी करण्यात येईल.
८. किमान नोदणीकृत वैद्यक व्यावसायिकाचे वैद्यकीय सक्षमता प्रमाणपत्र (मेडीकल फिटनेस सर्टीफिकेट)
९. आधारकार्डची छायांकित प्रत

सर्व प्रमाणपत्रे साक्षांकित केलेली असावीत.

उमेदवारांची गुणवत्ता यादी दिनांक २८/०८/२०१८ रोजी दुपारी ३:०० वाजता परिचारिका महाविद्यालयात लावण्यात येईल.

गुणवत्ता यादीबाबत काही आक्षेप दि.२९/०८/२०१८ रोजी दुपारी ०२:०० वाजेपर्यंत लेखी स्वरुपात परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालयात सादर करावेत.

दिनांक २९/०८/२०१८ रोजी सायंकाळी ५:०० वाजता सुधारित गुणवत्ता यादी लावण्यात यईल. विहीत मुदतीनंतर आलेले अर्ज, सहपत्रे व आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक ३०/०८/२०१८ रोजी सकाळी ०९:०० वाजता गुणवत्ता यादीतील सुचनेप्रमाणे उमेदवाराने सर्व मूळप्रमाणपत्रांसह परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे. मुलाखतीसाठी वेगळी पत्रे पाठविली जाणार नाहीत.

**विशेष सूचना** : प्रशिक्षणाकरिता पात्र ठरविण्यात आलेला उमेदवार शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. या करिता श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे वैद्यकिय तपासणी केल्यानंतरच उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल.

सही/-
अधिष्ठाता
श्री. छत्रपती शिवाजी महाराज
सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.